BVBK-0401666

# १ : सुसुल सुसुल के डुलक्या मारी

एक होता वाघ.

आपल्या घराचे दार ओढून घेऊन तो नदीवर आंघोळीला गेला.

एका सशाने त्याच्या घरात शिरून दारास आतून कडी लाविली.

मग त्याने फडताळ उघडून आतल्या दुधावरची साय मटकावली, मुरंबा फस्त केला, फळांच्या टोपलीतील फळे खाऊन टाकली आणि वाघोबाने चुलीवर ठेविलेला भात सांडून टाकिला.

नंतर वाघोबाच्या घरातले सगळे खाण्याचे जिन्नस गाठोड्यात बांधून ते गाठोडे उशाशी घेऊन तो वाघसमाचाराचा अंक वाचीत पलंगावर जाऊन निजला.

इकडे वाघोबांनी आंघोळ करून कुडकुडत येऊन दारावर डोके आपटले. दार बंद असल्याने त्याच्या डोक्याला खोक पडली. रागावून ते ओरडले, कोण शिरले आहे माझ्या घरी ?

सशाने पडल्या पडल्या म्हटले, सुसुल सुसुल के डुलक्या मारी, वाघोबाची तंगडी मोडी.

अरे बाप रे, माझी तंगडी मोडणारा हा कोण बळवान प्राणी ? भीती वाटून वाघ मागे फिरला व चौफेर धावत सुटला.

त्याला भेटले अस्वल.

ते म्हणाले, वाघोबा, तुम्ही कोणाला भिऊन पळत आहा ?

माझ्या घरात एक भयंकर प्राणी शिरला आहे. तो माझी तंगडी मोडीन म्हणत आहे.

भलतेच ! चला, मी त्या प्राण्याला मारून टाकतो.

अस्वलाला घेऊन वाघ आपल्या घराशी आला.

अस्वल ओरडून म्हणाले, कोण शिरले आहे ते वाघोबाच्या घरात ?



भीती वाटून वाघ मागे [illegible]ला

मुकाट्याने बाहेर ये. नाहीतर तुला गुदगुल्या करून मारून टाकतो.

सशाने फटीतून पाहिले व म्हटले, सुसुल सुसुल के डुलक्या मारी, वाघोबाची तंगडी मोडी, अस्वलाच्या झिंज्या तोडी.

हे ऐकताच वाघ आणि अस्वल दोघेही पळत सुटले. त्यांना भेटला एक रेडा. तो म्हणाला अरे, तुम्ही वेड्यासारखे पळत काय सुटला आहा ?

अस्वल म्हणाले, ए रेड्या, वाघोबाच्या घरात बघ कोण शिरले आहे ?

त्या दोघांना घेऊन रेडा वाघाच्या दारी आला आणि रेकला, कोण शिरले आहे ते वाघाच्या घरात ? बाहेर ये, नाहीतर शिंगांनी भोसकून तुझी आतडी बाहेर काढितो.

ससा म्हणाला, सुसुल सुसुल के डुलक्या मारी, वाघोबाची तंगडी मोडी, अस्वलाच्या झिंज्या तोडी, रेड्याचे शिंग फोडी.

त्यासरशी तिघेही प्राणी सैरावैरा पळू लागले. त्यांस पाहून एका वानराने विचारले, बाबांनो, तुम्ही धावण्याची शर्यत लावली आहे की काय ?

रेडा म्हणाला, अरे वेडया, शर्यत कसली ? वाघोबाच्या घरात कुणीतरी भयंकर प्राणी शिरला आहे.

चला, मी त्याला नखांनी फाडून टाकतो, असे म्हणून बाकीच्या तिघांसह वानर वाघोबाच्या घराशी गेले आणि म्हणाले, हूप् हूप् कोण शिरले आहे ते वाघोबाच्या घरात ? बाहेर ये, नाहीतर तुला नखांनी ओरबाडून ठार करीन.

ससा आतून म्हणाला, अरे जा काळतोंड्या, तुला माहीत नाही का ?

सुसुल सुसुल के डुलक्या मारी,
वाघोबाची तंगडी मोडी,
अस्वलाच्या झिंज्या तोडी,
रेड्याचे तर शिंगच फोडी,
अन माकडाचे तेल काढी.

हे ऐकताच सर्व जण घाबरून तेथून पळून गेले आणि सशाने हळूच दार उघडून खाण्याच्या जिन्नसांचे गाठोडे खांद्यावर टाकून आपल्या बिळात पलायन केले.

दार उघडे पाहून वाघोबा घरात शिरले. त्यांना भूक लागली होती, म्हणून आधी दूध शोधू लागले पण ते सशाने संपवून टाकले होते.

मुरंबा खलास झालेला होता.

टोपलीत एकही फळ शिल्लक नव्हते.

भात बिस्तवावर सांडून जळून गेला होता.

आता मी काय खाऊ ? असे ओरडून वाघ रडत बसला.

भागाबाई कुळधर्म करण्याकरिता शृंगारलेले मडके डोक्यावर घेऊन वाटेने चालली होती.

त्यातून हिरवेचार गव्हाचे कोंब डोकावून बघत होते. त्याजवर गंधाचे आणि कुंकवाचे पट्टे ओढलेले होते आणि फुले वाहिलेली होती. हिरवा फेटा बांधिलेल्या रजपूत वीराच्या शिरासारखे ते शोभिवंत दिसत होते.

वाटेवर राधाबाईचे खोपट होते. त्याच्या समोरील अंगण स्वच्छ सारविलेले असून त्यातल्या तुळशीवृंदावनाजवळ पणती तेवत ठेविली होती. पहाटेच्या अंधुक वेळी भोवतालच्या जागेस प्रकाशित करणारी ती पणती फार सुंदर आणि प्रसन्न दिसत होती.

तिचे काळे अंग, तिची तेजस्वी ज्योत आणि ज्योतीवरील काळा धूर पाहून एखाद्यास वाटले असते की, ती एक तरुण बाईच आहे.

वाईच च्या खाऊन जा की भागाबाई ! राधाबाईने आवंतिले.

ह्यो घट घेऊन जाती आहे देवीला, भागाबाई म्हणाली.

जाशील गो, घट ठेवून दे तुळशीजवळ नि आत ये, असा राधाबाईने आग्रह केल्यावर हातांतील मडके तुळशीजवळ ठेवून भागाबाई घरात गेली.

मडकोबाने वृंदावनाजवळील पणतीची ओळख काढून विचारिले, मुली, तुझे रूप किती नामी आहे ! तुझे नाव काय ?

माझे नाव पणती. मी बहुतकरून ह्या राधाबाईच्या नातीची मुलगी असेन.

कदाचित मुलीची नातही असशील, मडकोबा मध्येच म्हणाला.

ऐक रे, मधे बोलू नको. मुलीच्या नातीला पणती म्हणतात. राधाबाई



मडकोबा आणि पणतीबाई

माझी पणजी लागते.

पणजी तर एका गावाचे नाव आहे, मला घडविणाऱ्या कुंभाराच्या मुलग्याने पुस्तकात वाचताना मी ऐकिले, मडकोबा म्हणाला.

पणतीने मडकोबास त्याचे नाव विचारिले.

माझे नाव घट. माझी आई रोज माझी पूजा करिते. पणते, तू माझी बायको होशील काय ? घटाने विचारिले.

चल चावट कुठला, असे म्हणून पणतीने ज्योतीच्या फटकाऱ्याने घटास चांगलाच चटका दिला.

इतक्यात भागाबाईने मडकोबास उचलून नेले. घरी गेल्यावर त्याने तिला विचारिले, आई आई, माझे लग्न करशील का ग ?

भागाबाई म्हणाली, बाळ, आपण गरीब आहो. लग्नाला गूळ, तूप, हळद, मंगळसूत्र, तांदूळ असे जिन्नस लागतात. ते आपण कोठून आणणार ?

आत्ता आणून देतो, असे म्हणून मडकोबाने धूम ठोकिली. डोक्या-वरचे कोंबाचे ओझे फेकून देऊन तोंड धुऊन तो वाण्याच्या दुकानात गुळाच्या ढेपीशी येऊन उभा राहिला.

एक मनुष्य गूळ घेत होता. त्याला वाटले, आयते मडके मिळाले आहे, त्यात गूळ घालून घरी घेऊन जाऊ. म्हणून त्याने मडकोबाच्या तोंडात गूळ टाकिला. लगेच मडकोबा निसटला. आणि नदीच्या घाटावर बायका अंग धूत होत्या तेथे जाऊन उभा राहिला.

एका बाईचे मंगळसूत्र आंघोळ करता करता ओघळले, तेव्हा त्यातील मणी हरवू नयेत म्हणून तिने मडकोबाच्या तोंडात जपून ठेविताच मडको-बांनी पोबारा केला.

घरी जाऊन त्याने गूळ आणि मंगळसूत्र आईजवळ दिले आणि एका तेल्याच्या दुकानी स्वारी हजर झाली. तेली भांड्यात माप घालीत असता

मडकोबाने आपला एक कान मापाखाली धरला व तो तेलाने भरून घेऊन तो दाणेवाल्याकडे गेला.

दाणेवाला तांदुळाचे माप घालीत होता. मडकोबाने दुसरा कान मापाखाली धरून भरल्या कानानिशीं निसटता पाय घेतला.

आता थोडे पैसे मिळवावयाचे राहिले, असा विचार करीत असता त्यास एक आंधळ्याचे सोंग घेतलेला भिकारी दिसला. हा भिकारी आपल्या सोबत्याच्या बदली तेथे बसला होता आणि सोबती बोलपट पाहण्यास गेला होता. आंधळ्यासमोर अंथरलेल्या पोत्यावर मडकोबा उभे राहिले.

लोकांस वाटले, आंधळ्याला द्यावयाचे पैसे मडक्यात टाकावयाचे आहेत. म्हणून त्यांनी मडक्यात पैसे टाकिले. चांगला दीड रुपयाचा खुर्दा जमल्यावर आंधळ्याने डोळे किलबिले करून पाहिले.

अरे लुच्च्या, माझे आंधळ्याचे पैसे गिळायला पाहातोस काय ? असे म्हणून आंधळा मडकोबास पकडणार तोच मडकोबांनी यःपलायन केले. आंधळा त्याच्यामागे धावत सुटला.

अरे ढोंग्या, आंधळ्याचे सोंग घेऊन आम्हांस फसवतोस काय ? असे म्हणून लोक आंधळ्याच्या पाठीस लागले.

तेवढ्या गडबडीत धापा टाकीत घरी पोचून मडकोबा म्हणाले, आई, आई, हे घे लग्नखर्चाचे पैसे.

अरे, पण तुला मातीच्या मडक्याला आपली सोन्यासारखी मुलगी कोण देणार ?

कोण म्हणजे ? राधाबाईची नात मला आपली मुलगी देणार आहे.

राधाबाईला नात कोठे आहे ? भागाबाईने विचारिले.

मग तिला पणती ग कशी झाली ? नात असल्यांशिवाय कोणाला पणती होते का ? मडकोबा त्रासून म्हणाला.

अस्से अस्से ! तुला राधाबाईच्या पणतीशी लगीन करायचे आहे जणू ?

मडकोबा भाजल्यासारखा लाजेने लाल झाला.

नवरात्र संपले. दिवाळी गेली आणि तुळशीच्या लग्नाबरोबरच मडकोबा आणि पणती यांचे लग्न लागले.

शुभमंगल सावधान, सिंहाचे डोळे वाघाचे कान !

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. १६६६ दिनांक ३१/८/०८
विषय .. क्र...........



गंभीरकुमार आणि हंबीरकुमारी यांचा विवाह

[ १ ]

गंभीरराव नावाचा सरदार गंभीरगडाचा आणि हंबीरराव नावाचा सरदार हंबीरगडाचा, असे संस्थानिक मोठे पराक्रमी परंतु आपसात भांडणारे होते. गंभीररावास गंभीरकुमार नावाचा मुलगा होता. हंबीररावाने आपली मुलगी हंबीरकुमारी आपल्या मुलास द्यावी अशी गंभीररावाची इच्छा होती.

हंबीररावाचे म्हणणे असे होते की, गंभीररावाने स्वतः येऊन मुलीस मागणी घालावी.

ह्या कारणाने दोघांमध्ये नवीन लढाई जुंपणार असा रंग दिसू लागला. गंभीररावाने सैन्याची जय्यत तयारी करून दसऱ्याच्या मुहूर्तावर सकाळच्या प्रहरी सूर्योदयाबरोबर सर्व सैन्यासह गंभीरगडाहून कूच करून हंबीरगडाचा डोंगरावरून जाणारा मार्ग धरिला. गडावरील एकूण एक मनुष्य त्याच्याबरोबर निघाला.

हंबीरराव सूर्योदयानंतर घटकाभराने सैन्यासह हंबीरगडाहून गंभीरगडावर स्वारी करण्यास डोंगराच्या पायथ्यालगत जाणाऱ्या वाटेने निघाला. वाटेत एका ठिकाणी डोंगरावरून झडणाऱ्या नगाऱ्याचा आवाज हंबीररावाच्या कानी पडला. परंतु त्याला वाटले, आपल्या आघाडीच्या वाजंत्र्यांचा हा पडसाद असेल.

[ २ ]

गंभीरराव हंबीरगडाजवळ पोहोचला, तेव्हा त्यास वाटले, गडावरून आपल्यावर बाणांचा मारा होणार. तो झाला नाही तेव्हा त्यास वाटले, शत्रू दबा धरून बसले आहेत. गडाचा दरवाजा सताड उघडा पाहून त्यास

वाटले, आपल्याला आंत घेऊन नंतर आपल्याला दगा देण्याचा शत्रूचा विचार असावा.

गडात प्रवेश केल्यावर आपल्या अंगास हात लावण्यास देखील तेथे चिटपाखरू उरले नाही, हे पाहून त्यास आनंद आणि आश्चर्य वाटले. आपल्या हल्ल्याची बातमी अगोदर कळून हंबीररावाने गडावरून पलायन केले असले पाहिजे अशी सर्वांची खात्री झाली.

अनायासे गड हाती आल्यामुळे गंभीररावाच्या सैन्यास अति आनंद झाला. त्यांनी सर्व दिवस खाण्यापिण्यात, नाचगाण्यात, आणि मौज करण्यात घालविला हे सांगावयास नकोच.

तरी हंबीरकुमारी हातची निसटल्याबद्दल गंभीररावास वाईट वाटलेच.

[ ३ ]

जशी हंबीरगडी पोचल्यावर गंभीररावाची स्थिती झाली तशीच हंबीर-रावाची गंभीरगडी पोचल्यावर झाली. गंभीरगडाचा दरवाजा तेथील लोकांनी निघून जाताना नुसताच लोटून ठेविला होता. हंबीररावांच्या लोकांस वाटले, तो आतून बंद आहे म्हणून तीस चाळीस बळकट शिपायांनी एकदम तो लोटण्याकरिता त्यास रेटा दिला. त्यासरशी दारे फटकन उघडून सगळेजण तोंडघशी पडले. अनायासे आपल्या हाती गंभीरगड सापडून आपल्या पूर्वजांची इच्छा तृप्त झाली असे त्यास समाधान वाटले.

हंबीररावाच्या लोकांनी गंभीरगडावरील वेगवेगळ्या घरांचा ताबा घेतला. हंबीररावाने गंभीररावाच्या महालात राहण्याचे ठरविले. त्याच्या-बरोबर त्याची मुलगी हंबीरकुमारी होतीच.

आपल्या नव्या वाड्याची तपासणी मोठ्या हौसेने करीत असता कुमारीस तेथे एका पलंगावर गुरगटून निजलेला एक बारा वर्षांचा मुलगा दिसला.

दुपार होईपर्यंत निजून राहणारा हा कोण कुंभकर्ण इथे पडला आहे ? असे म्हणून तिने तपेलीभर गार पाणी त्याच्या अंगावर ओतले.

गंभीररावाचे सैन्य जेव्हा गडावरून निघाले तेव्हा निजलेल्या गंभीर-कुमाराची त्यांस आठवण झाली नाही.

कुमार जागा होऊन आळोकेपिळोके देऊन कुमारीकडे पाहात म्हणाला, कोण ग तू, कोण ग तू माझ्या अंगावर पाणी ओतणारी ? मुलगी आहेस म्हणून गय करतो. मुलगा असतीस तर ह्या तरवारीने तुझे हात छाटून टाकले असते.

इतक्यात हंबीरराव तेथे आले व कुमारास ओळखून आनंदाने म्हणाले, " भगवान एकलिंगजीची कृपा ! आमचा जावई आयताच आमच्या स्वाधीन झाला आहे. आता कोण गंभीररावाची विनवणी करायला जातो आमच्या मुलीला पदरात घ्या म्हणून ? "

[ ४ ]

दुसऱ्या दिवशी आनंदाचा भर ओसरल्यावर गंभीररावांच्या ध्यानात आले की, आपला मुलगा गडावरच राहिला आहे. त्यांनी मुलाला हंबीर-गडावर आणण्याकरिता पाच स्वार पाठविले.

दुपारी स्वारांचा नाईक परत येऊन रामराम करून भीतभीत म्हणाला, सरकार, घात झाला. हंबीररावांनी आपला गंभीरगड ताब्यात घेतला असून कुमार त्यांच्याच ताब्यात आहेत.

गंभीररावांस भयंकर क्रोध आला, त्यांनी सैन्यास परत गंभीरगडाकडे कूच करण्याचा हुकूम दिला. संध्याकाळच्या वेळी गंभीरराव सैन्यासह परत गंभीरगडाजवळ आले. परंतु हंबीरराव हातात शस्त्र न घेता सणासुदीचा वेष करून पुरोहितासह सामोरे आलेले पाहून ते थबकले.

हंबीरराव ! मी तुमच्याशी लढायला आलो आहे. मुकाट्याने माझा



हंबीरकुमारी आणि गंभीरकुमार

मुलगा माझ्या स्वाधीन करून सोयरिकीची विनवणी करा, नाहीतर युद्धास सज्ज व्हा.

हंबीररावांनी नारळ व पानसुपारी गंभीररावांच्या हाती दिली आणि म्हटले, आता आपण व्याही झालो आहो. आज आपण सर्व माझ्या मुलीच्या तुमच्या मुलाशी होणाऱ्या विवाहाचे पाहुणे आहा. तुमचे स्वागत असो !

कुमार आणि कुमारी यांचा विवाह मोठ्या कडाक्याने झाला. हंबीरराव गंभीरगडावर आणि गंभीरराव हंबीरगडावर राहू लागून त्यांचे कुलवैर समाप्त झाले.



श्यामकर्णाचे अवभृत स्नान

गर्वसेन राजा मानपूर नगरीत जो आहे तो आपल्या राजसभेत छाती बाहेर काढून मिशांना पीळ देत सभासदांवर गुरगुरत सिंहासनावर बसला होता. भटलोक जे आहेत ते त्याचे स्तुतिपाठ गात होते :—

कोण तुजसम जगी बलवान ।
नरेशा मानपुरनृपा किती असासि मतिमान ।
सुरवरहि वैभवा बघुनि घालती खाली मान ॥

भाटांचे कवन पूर्ण होण्याच्या आत नारदमुनींची स्वारी सभेत प्राप्त झाली आणि उद्गारली, थांबा थांबा, अश्वमेध यज्ञ करून सर्व नृपांवर दिग्विजय केल्याशिवाय असला स्तुतिपाठ स्वतःभोवती ओवाळून घेण्याचा कोणालाही अधिकार नाही.

नारदास उत्थापन देऊन राजाने विचारिले, हे देवर्षे, अश्वमेध करायला श्यामकर्ण घोडा लागत असतो. हल्ली तर राजमंडळात कोणाजवळही तसला घोडा नाही.

नारद म्हणाले, राजा, विनयपूरचा राजा चतुरसेन याच्याजवळ श्यामकर्ण आहे. तो त्याने कडेकोट बंदोबस्तात ठेविला आहे.

गर्वसेनाने मिशीस इतक्या जोराने पीळ दिला की, ती तुटून पडते की काय अशी सर्वांस भीती वाटली. तो ऐटीने म्हणाला, सप्तपाताळात जरी त्याने श्यामकर्ण लपवून ठेविला असला तरी हा गर्वसेन तो हुडकून हरण करून घेऊन येईल.

नारद म्हणाले, घोडा जिंकून घेऊन ये पण त्याचे हरण करू नको. अश्वमेधाला हरण उपयोगी पडत नाही. असो, आम्ही आता वैकुंठास जातो, असे म्हणून भजन करीत नारद अंतर्धान पावले.

पंधरा दिवसांनी चतुरसेनाने घाबरून जाऊन आपण होऊनच श्याम-

...२

कर्णाची पाठवणी आश्वपालासह केली. युद्धाला तोंड देण्याची त्यास शक्ती नव्हती. गर्वसेनाने अश्वमेधाची तयारी करून देशोदेशीच्या राजांस बोलावणे जे आहे ते पाठविले.

मानपुरात केवढी धामधूम चाललेली होती! गर्वसेन महाराजांचा अश्वमेध आज यथासांग संपूर्ण होऊन त्यांस राजमंडळाकडून सम्राट पदवी मिळणार होती.

नाना प्रकारची वाजंत्री, ध्वजपताका, डामडौल, थाटमाट, चकचकाट, लोकांची ही गर्दी यांचे वर्णन सांगत बसलो तर सर्दीच व्हायची तुम्हांला!

ब्राह्मणांनी मंत्र म्हटले आणि श्यामकर्ण आणा श्यामकर्ण, अशी ओरड केली. पाव घटकेत नटविलेला, सजविलेला श्यामकर्ण मंडपाकडे ठुमकत ठुमकत अश्वपालासह आला.

घोडा अगदीच ठेंगणा दिसतो आहे, सर्व लोक त्यास बघून कुजबुजले.

अजून लई ल्हान हाये, जरा मोठा झाल्यावर पगा हात्तीला बी त्याच्याकडे पघताना डोळे वर करायला लागतील, आश्वपाल त्याची पाठ कुरवाळीत म्हणाला.

ओं लांगूलं पूजयामि महाराज, अश्वमेधात आधी अश्वाच्या शेपटीची जी आहे ती पूजा करावी लागते, असे पुरोहितांनी सांगितल्यावरून गर्वसेन श्यामकर्णाच्या मागे उभा राहून शेपटीस गंध लावू लागताच श्यामकर्णाने मागले दोन्ही पाय जुळविले.

मग त्या पायाच्या प्रहाराने गर्वसेनाची सदोदित पुढे असलेली छाती त्याच्या बरगड्यांत दडपून टाकिली.

गर्वाचे घर खाली आलेले पाहून सर्व पाहुण्यांस आनंद झाला. परंतु त्यांनी आपापल्या शेल्यांनी तोंडे झाकून तो बाहेर दिसू दिला नाही.

महाराज, आता अश्वाला अवभृथ स्नान जे आहे ते घातले पाहिजे, पुरोहित म्हणाले.

अश्वपाल घाबरल्यासारखे करून म्हणाला, अहो बामणबुवा, सांबकर्णाला न्हायला घालू नका. त्याला गारठा बाधेल.

अश्वपालाचे न ऐकता चार राजसेवकांनी श्यामकर्णाचे डोके धुण्यास प्रारंभ केला. त्याच्या कानांचा काळा रंग पाण्याबरोबर वाहून जाऊन कान पांढरे दिसू लागले.

गर्वसेनाला संशय येऊ लागला की चतुरसेनाने पांढरा घोडा आपल्याला दिला.

इतक्यात श्यामकर्णाच्या शेपटीवरून पाणी जाऊन तेथे चिकटविलेले गंगावन खाली पडले. एक सेवक त्याचे कान चोळू लागला, तेव्हा कान दुमडून त्यांजवर बांधलेली सुतळी निसटली आणि एकदम वीतवीत लांबीचे कान ताडकन उभे राहिले.

दुसऱ्या सेवकाने श्यामकर्णाच्या तोंडात कोंबलेला बोळा उपसून काढताच आपण श्यामकर्ण नसून लंबकर्ण आहो अशी जोराची घोषणा त्याने केली.

अरे लुच्च्या ठका, अशा तऱ्हेने माझा अश्वमेध तू फुकट घालवितोस काय ? हे घे तुला बक्षीस, असे म्हणून गर्वसेनाने अश्वपालावर तरवारीचा वार करण्याच्या आधीच तो लंबकर्णावर आरोहण करून पुष्कळ लांब पळाला होता.

ह्या कारणाने गर्वसेनाची फजिती होऊन त्याच्या हातचे सम्राटपद गेले इतकेच नव्हे, तर ही त्याची गोष्ट देखील येथेच संपली.



श्री गजानन महाराजांची कृपा

## ५ : गरिबाचा गणपती

भागाबाई आणि तिचा मुलगा भाग्या अशी गरीब मायलेकरे आपल्या झोपडीत समाधानाने राहात असत.

गणेशचतुर्थी जवळ आली. जो तो आपल्या ऐपतीप्रमाणे लहान-मोठा, रंगीत-साधा, स्वस्त-महाग गणपती आणू लागला.

भाग्या म्हणाला, आई, आपल्याला गणपती नाही का आणायचा ?

आई म्हणाली, बाळ, आपण गरीब. एका पैशाचा गणपती आणला तरी त्याला नैवेद्य दाखवायला आपल्याजवळ काय आहे ?

गरिबाच्या गणपतीला आपण गरिबीचा नैवेद्य दाखवू.

भागाबाईने एक पैशाचा ठशाचा गणपती आणून त्याची स्थापना केली. गुलबक्षीच्या फुलांची माळ त्याच्यावर चढविली आणि गूळखोबऱ्याचा नैवेद्य दाखविला.

रात्री तिने गणपतीसमोर वीतभर खोल खड्डा खणिला व प्रार्थना केली, जय गजानन ! मुलाच्या हट्टाकरिता मी आपल्या झोपडीत तुला यायला लाविले याची क्षमा कर. कोरड्या गूळखोबऱ्याचा नैवेद्य तुला बाधला तर रात्रीच्या वेळी कोठे जाशील ? या खड्डयातच बैस.

सकाळीं उठताच भागाबाईने खड्डा स्वच्छ करण्याकरिता त्यात हात घातला तो तिच्या भोळ्या भक्तीला प्रसन्न होऊन गणपतीने त्या मायलेकरांस श्रीमंत केले.

भागाबाईचा नवा थाटमाट पाहून तिच्या श्रीमंत मालकिणीने तिला विचारले " भागा, त्वां ही श्रीमंती कशी मिळविली ? "

भागाबाईने, मालकीणबाईना सारी हकीकत सांगितली.

[ १ ]

डोरलेगावाच्या पाटलांचा वाडा गावच्या वेशीबाहेर मोकळ्या जागेत बांधलेला होता. पाटील मंडळीस गाण्याचा फार षोक असल्याने पेटी, तबला, दिलरुबा इत्यादी वाद्यांचा संच त्यांच्याकडे भरपूर होता. शनवारच्या रात्री जवळच्या शहरांतील नामांकित गाणारांच्या बैठकीत खर्च होत असत. सबंध गाव आणि भोवतीचा कोसभर प्रदेश रात्रीच्या वेळी मंजुळ सुरावटीने बहरून जात असे.

कोणतीही चांगली गोष्ट फार दिवस चालू राहणे कठीण असते, असे गोमाजीपंत कापसे नेहमी म्हणतात त्याप्रमाणे, डोरल्याच्या संगीत-परंपरेत खंड पडण्याचा समय आला. तेथून एक कोस अंतरावर नदीस धरण बांधण्याचे काम सुरू झाले, आणि खोदलेली दगड-माती दुसरीकडे टाकण्याच्या कामावर वडारी लोकांच्या तांड्याची नेमणूक झाली. वडाऱ्यांनी दीड-दोनशे लंबकर्णांचे पथक या कामाकरिता आणिले.

दिवसभर भारवाहकाचे काम करून टाकिल्यावर ही पागा रात्रौ विश्रांतीसाठी पाटलांच्या वाड्याजवळील विस्तृत पटांगणात लोळण घेऊन श्रमपरिहार करू लागली. त्यानंतर करमणुकीकरिता तिचा नृत्यगायनाचा कार्यक्रम सुरू होई.

गेंद्या नावाचा इराणी अश्व लंबकर्णांचा नायक होता. लोळण्याचा अव्यवस्थित कार्यक्रम संपताच गेंद्या आपले कान टवकारून सावधानाच्या पवित्र्यात उभा राही. त्याच्या मागोमाग सर्व सैनिक त्याच्या भोवती त्याच पवित्र्यात अर्धवर्तुळाकृती उभे राहात. गेंद्याच्या पाठीमागे मात्र कोणी उभा राहत नसे. कारण, त्याच्या चरणांचा प्रसाद फारसा कोणास आवडत नसे.

नंतर गेंद्या आत श्वास घेत पहिल्या सप्तकातील खर्ज सूर काढून तीस पळे घुमे.

त्याचे अनुयायी त्याच्या सुराला सूर देत.

बाहेर श्वास टाकीत तो ऋषभ स्वरात आलाप काढी.

नंतर त्याचे अनुयायी तसेच करीत.

अनुक्रमाने पहिल्या सप्तकातील सात स्वर झाल्यावर गेंदूबुवा दुसऱ्या सप्तकास प्रारंभ करीत; आणि तिसऱ्या सप्तकानंतर गायनाचा पहिला कार्यक्रम खलास होई.

श्वास बाहेर टाकताना 'हूं' आणि वर ओढताना 'ऊं' ही दोनच अक्षरे गेंद्याच्या चिजांत उच्चारली जात असत.

गायनाचा हप्ता संपताच नृत्यास प्रारंभ होत असे आणि त्यानंतर सर्व कलावंत सामुदायिक ग्रामप्रदक्षिणा करून पुन्हा वाड्याजवळ जमून जलशाचा दुसरा हप्ता सुरू करीत.

[२]

या गाढवांच्या गोंधळामुळे पाटील मंडळीस नित्य जागरणे होऊ लागली. जागरणामुळे अपचन जडून सर्वांच्या प्रकृती बिघडल्या. गायनवादनाचे कार्यक्रम बाहेरील गोंधळामुळे बंद पडले. गाढवांस घालवून देण्याकरिता नोकर आणि कुत्री यांची योजना निष्फळ ठरली व कामगिरीवर पाठविलेल्यांची थोबाडे मात्र चांगलीच सुजली.

शेवटी पाटील मंडळींनी कंटाळून कानात घालण्याचे दट्टे तयार करण्याचा हुकूम सुतारास दिला, आणि बाहेरील आवाज आत न ऐकू येऊ देण्याच्या युक्तीत निष्णात असलेल्या बोलपट शिल्पकारास त्यांनी आमंत्रण पाठविले.

मध्यंतरी शहरचे एक वकील काही कामाकरिता पाटलाच्या घरी पाहुणे आले. त्यांनी पाटलांचे हाल पाहून त्यांस सांगितले, " येथील




लंबोदरबुवांनी मध्यभागी विराजमान होऊन घसा साफ केला

गाढवांस हा टापू कायमचा सोडून पळवून लावणारा एक निष्णात मी उद्याच शहरातून पाठवितो. त्याला मोठी बिदागी द्या म्हणजे झाले."

दुसऱ्या दिवशी दुपारी एक मोटार-खटारा पाटलांच्या दाराशी येऊन थडकला. खटाऱ्यातील एका इसमाने पाटलांच्या चाकराजवळ परिचयपत्र दिले. ते त्याने मालकास नेऊन दिले, त्यात पुढीलप्रमाणे मजकूर होता :—

श्री

चिठ्ठी घेऊन येणारे गृहस्थ संगीतसागर, स्वरदुंदुभी, खर्जपरायण लंबोदरबुवा भोपळे यांस आपण उदार आश्रय द्यावा. ख्याल, टपा, धृपद आणि तराणे गाण्यात हे पटाईत असून सारंगीसारंग सुदामदेव पडवळ, तबलाबहाद्दर हैदोस दुल्ला, आणि तंबोराधारक बालगवई मास्टर मारुती यांच्या साथीसह हे असा धुडगूस माजवून देतील की, आपल्या घराजवळील लंबकर्ण-सैन्याची क्षणार्धात दाणादाण उडून जाईल.

आपला

वकील

पाटलांनी वाड्याच्या पडशाळेत लंबोदरबुवांच्या ताफ्याला जागा दिली आणि रात्री बुवांचा जलसा वाड्यात करण्याचे ठरले.

[ ३ ]

रात्री दहाच्या सुमारास निमंत्रित श्रोते येऊन स्थानापन्न झाले. तबला व तंबोरा यांचे सूर लागले. ठाकठोक, ठुम्ठुम्, टुंईटुंई असे आवाज काढीत वाद्ये कण्हत असताही तबल्याला हातोड्याचा मार बसत होता व तंबोऱ्याचे कान पिळले जात होते. काही वेळाने लंबोदरबुवा मध्यभागी विराजमान होऊन घसा साफ करू लागले.

नित्याप्रमाणे गर्दभसेना वाड्याबाहेरील पटांगणात गोळा झाली. लोळण घेण्याचा कार्यक्रम संपवून सर्व लंबकर्ण वर्तुळाकार उभे राहिले. आपला पहिला आलाप घेण्याकरिता गेंग्या श्वास गोळा करीत होता. आता तो सूर काढणार इतक्यात पाटलांच्या दिवाणखान्यातून लंबोदरबुवांच्या कंठातून निघालेला कर्कश खर्ज त्याच्या कर्णपथावर येऊन आदळला. आपल्या स्वराला लाजविणारा हा आवाज ऐकताच त्याचे टवकारून उभारलेले कान लटके पडले; आपल्या नायकाचा तेजोभंग पाहून त्याच्या सर्व पाइकांची निष्ठा ढासळण्याच्या बेतात आली.

आपल्या नाइकपणाच्या रक्षणाकरिता, आपल्या गर्दभ जातीच्या इभ्रती-करता या वेळी जिवाच्या मोलाने शिकस्त करून पाहिली पाहिजे असा गेंग्याने निश्चय केला. आणखी श्वास पोटात जमवून त्याने एक मोठ्या पल्ल्याची भरघोस दाणेदार तान सोडली.

लंबोदरबुवांचा संगीताभिमान गेंग्याच्या अभिमानापेक्षा तिळमात्र कमी नव्हता. एक यःकश्चित् गाढव आपल्यापेक्षा भरड आवाजात तान घेत आहे, हे त्यास कसे सहन होणार ! त्यांनी वरच्या सप्तकातील निषादाची एक लकेर हवेत सोडून दिली.

गायनविद्या गर्दभ जातीतून निर्माण झाली असावी आणि सप्तकातील तिसऱ्या स्वराचे 'ग' हे नाव त्या जातीचे स्मारक म्हणूनच संगितकारांनी ठेविले असावे, असे गेंग्यास वाटत होते. तिसऱ्या सप्तकातील तिसरा स्वर तरी आपल्याला दगा देणार नाही, अशी खात्री होऊन गेंग्याने डोळे पांढरे होईपर्यंत आत श्वास ओढून त्या स्वरातील एक पहाडी तान सोडून सर्व दिशा दणाणून टाकिल्या.

तिसरा स्वर 'ग' हा जरी गर्दभापासून उत्पन्न झाला असला, तरी त्याच्या वरचा 'म' हा मनुष्यप्राण्याची श्रेष्ठता निःसंशय प्रस्थापित करितो. गेंग्याच्या तानेचा प्रतिध्वनी शांत होण्याच्या आत लंबोदरबुवांनी

चौथ्या स्वरातील तानेने लांबलचक भेंडोळे हवेवर विषारी धुराप्रमाणे पसरून दिले.

संभावितस्य च अकीर्तिः
मरणाद् अतिरिच्यते ।

संभावितास अकीर्तीपेक्षा मरण बरे वाटते. मनुष्यावर ताण करण्याचा शेवटचा प्रयत्न म्हणून गेंद्याने सारखी तीन मिनिटे श्वास ओढून घेतला. परंतु या जीवावरच्या प्रयत्नांत त्याच्या पोटाचे टाके तटातट तुटले आणि त्याच्या आत्म्याने गंधर्व-लोकात प्रवेश केला.

आपल्या जातीची झालेली ही विडंबना गेंद्याच्या अनुयायांस इतकी लाजीरवाणी वाटली की, ते सर्व डोरल्याची हद्द सोडून दुसरीकडे निघून गेले.

ज्यांच्या कर्तबगारीने आपल्या मागचा रोजचा जागरणाचा त्रास चुकला, त्या लंबोदरबुवांस पाटलांनी एक सुवर्णपदक अर्पण केले. त्याजवर गेंद्याची प्रतिमा उठविली होती.



‘ कोण आहे ? ’ असे शब्द कानी पडून ती दोघे दचकली

## ७ : भूतदयेचे बक्षीस

नाना आणि मनी अशी दोघे भावंडे आपल्या मामाच्या घरी जेवावयास गेली होती. घरात शिरताच आढ्याच्या बाजूने ‘ कोण आहे ? ’ असे शब्द कानी पडून ती दोघे दचकली. वर पाहतात तो एका पितळेच्या पिंजऱ्यात बसलेल्या पोपटाने हा प्रश्न विचारला होता असे ध्यानात येऊन त्यांस फार कौतुक वाटले.

मामाने पिंजरा खाली काढिला आणि पोपटाकडून घरातील माणसांची नावे, मुलांच्या रडण्याची नक्कल, आणि मांजर, कुत्रा इत्यादिकांच्या सारखे आवाज काढविले. पोपटाच्या करामतीमुळे तो मुलांस हवासा वाटला. घरी परत जाताना दोन दिवस पोपट घेऊन जाण्याची परवानगी त्यांनी मामाजवळ मागितली. मामा परवानगी देण्यास तयार होता, परंतु मामी रागावली व म्हणाली, “ काही नाही पोपट घेऊन जायचा. पिंजऱ्याचं दार उघडं राहिलं तर बोकोबा येऊन बिचाऱ्याची चटणी उडवतील ! तुम्हांला वाटेल तेव्हा इथेच येऊन त्याच्याशी खेळत जा.”

मामीच्या नकाराने खट्टू झालेली मुले हिरमुसल्या तोंडाने रस्त्याने जात असता मुलांचा एक घोळका त्यांच्या नजरेस पडला. ती वात्रट मुले एका लहानग्या पाखरास खडे मारीत होती. पाखरू खड्यागणीक तोंड वासून आपली वेदना दर्शवीत होते. त्या मुक्या प्राण्याची स्थिती पाहून व त्याची दया येऊन मनीने पटकन ते आपल्या ओच्यात टाकिले आणि मुलांचा मारा चुकवीत ती धावत घरात आली. तिच्या पाठोपाठ नाना होताच.

नाना तिटकाऱ्याने बोलला, “ मने, टाकून दे ते चिमणीचे भिकारडे पोर.”

मनी म्हणाली, “ असूं दे परते चिमणीचे पोर ! ह्या पोरक्या पिलाला मी पीठ अन् दूध घालून मोठे करीन. सगळ्या प्राण्यांवर दया करावी

आपला धर्म आहे."

" मोठ्या आल्या आहेत आजीबाई धर्म सांगायला. घाल खुशाल त्या पाखुरड्याला तू दाणापाणी. मी एखादा पोपटचं बाळगीन ", नाना म्हणाला.

मनीने त्या पिलास एका पिंजऱ्यात ठेवून बोळ्याने दूध पाजून वाचविले. चार-पाच दिवसांनी त्याच्या अंगावर हिरवट लव दिसू लागली. मनीची आई तिला म्हणाली, " मने, हे पोपटाचं पिलू दिसतं आहे. तुझ्या भूत-दयेचं तुला देवानं बक्षीस दिलेलं दिसतं. हे पिलू सहा महिन्यांत बोलू लागेल."

आता मात्र नानाच्या तोंडास पाणी सुटले. तो म्हणाला, " मने, बरं झालं आपण ते पिलू पोरांच्या तडाख्यातून वाचविलं ते." तरी पण मनीने चांगुलपणा दाखवून नानाच्या ' आपण ' या शब्दास हरकत घेतली नाही.

पोपटाला जणू काय नानाची माहिती पुरती होती, अशा तऱ्हेने तो वागे. मनीलाच तो नेहमी हाका मारी आणि नानाचे नावही उच्चारीत नसे. मनीने दिलेला खाऊ आवडीने खाई आणि नानाने हात पुढे करताच त्यास कडकडून चावे. अशा प्रसंगी नानास आपल्या निर्दयपणाचा पश्चात्ताप होई.

ही पाहा पाठीस दप्तर टांगलेली मनी शाळेतून परत येत आहे आणि पोपट पिंजऱ्यातल्या पिंजऱ्यात येरझारा घालून बाहेर डोके काढीत, " मने, मला भूक लागली " असे ओरडत आहे.

निबिड अंधकारातून जाफरखान जमादाराची फौज आपल्या पुढाऱ्याच्या मागून पायी चालत होती. आघाडीशी जाफरखान आणि लखोबा असे दोन पुढारी आणि जाफरखानाचा शिंगवाला हुसेन असे तिघे तट्टांवरून चालले होते. " खानसाहेब, इथून हा दोन कोस सारखा उतार उतरतांच कोयना नदीचं पात्र आहे. सध्या त्यात घोट्याइतकं पाणी आहे. ती ओलांडताच आमचं हेळवाक गाव लागतं. या वेळी सगळीकडे सामसूम झालेली आहे. अशा वेळी आपण गावाला गराडा दिला आणि निजलेल्या रामरावाला गिरफदार केलं की सगळा गाव आपल्या ताब्यात आलाच म्हणून समजा."

" खरोखर आजची रात्र इतकी शांत आहे की, रातकिड्यांनी देखील आपलं गाणं बंद ठेवलेलं दिसतं. लखोबा, तुझ्या भावापासून गावाची देशमुखी तुझ्याकडे आली की, जाफरखानाचं बक्षीस विसरू नको ", जाफरखान म्हणाला.

फौजेच्या वाटेच्या कडेने कोयना नदीचा प्रवाह मार्गदर्शकाचे काम करीत होता. तिच्या पाण्यात आकाशातील नक्षत्रांचे प्रतिबिंब इतके स्पष्ट उमटले होते की, लखोबाच्या काळजासारखे आकाशच आज उलटे झाले नाही ना अशी सर्वांना शंका वाटत होती. हेळवाकवरील हल्ला गुपचूप करावयाचा असल्याने पायांतील जोडे देखील वाजू नयेत म्हणून सैनिकांनी पाठुंगळी बांधून घेतले होते. खोकण्या-शिंकण्याचाही आवाज दाबून ठेविलेला क्वचित बाहेर येत होता. " ह्यः ह्यः ह्यः खानसाहेब, असं कधी झालं आहे ? तुमचे उपकार हा लखोबा कधी विसरणार नाही. आता जरा उजव्या बाजूनं चला. रामरावाला कैद करायला भुयारातून वाड्यात गेलं पाहिजे. चारपाच असामींनी त्याच्या शेजघरात एकदम शिरकाव ",



शिंगवाला हुसेन लखोबाची मसलत ऐकत आहे

आणखी तो झोपेत असताना त्याला बांधून टाकलं की गाव हस्तगत झालाच म्हणून समजा."

हुसेन शिंगवाला त्या स्वजनद्रोही लखोबाचे आणि धूर्त जाफरखानाचे संभाषण कान देऊन ऐकत होता. त्याला त्याच्या पंधराव्या वर्षी जुलुमाने बाटविण्यात आले होते. जातभाई त्यास स्वधर्मात परत घेईनात म्हणून तो गेली दोन वर्षे मुसलमानी सैन्यात नोकरीस राहिला होता; तरी अद्याप त्याचे अंतःकरण कट्टे मराठे राहिले होते. तो रामराव देशमुखांच्या वाड्यातील एका मोलकरणीचा मुलगा असून त्याचे पूर्वीचे नाव 'हऱ्या' होते.

रामराव अतिशय रागीट पण प्रेमळ अंतःकरणाचे असल्याने इतर आश्रितांच्याप्रमाणे हऱ्याची त्यांजवर भक्ती असे. एकदा सह्याद्रीच्या जंगलात रामरावाबरोबर हऱ्या शिकारीस गेला होता. रात्रीच्या वेळी निजानीज झाल्यावर हऱ्याच्या कानी वाघाची गुरगुर ऐकू आली. भीतीने त्याची बोबडी वळली. परंतु रामराव जागे होते. तीर मारल्यास कदाचित हऱ्याला लागेल म्हणून तरवारीने वाघाला हटविण्याचा त्यांचा निश्चय त्यांच्याजवळ पडलेल्या मित्राने ऐकून म्हटले, "जाऊं द्या देशमुख. त्या बटकीच्या पोराकरिता रात्रीच्या वेळी आपला जीव धोक्यात का घालविता?"

"आपल्याबरोबर आपल्या भरंवशावर आलेल्या जीवाकरिता जीव देणं मराठ्याचा धर्म आहे", असे उत्तर देऊन रामरावांनी वाघाच्या डोळ्यांशिवाय किंवा लुकलुकणाऱ्या चांदण्यांशिवाय इतर दिवा नसलेल्या त्या काळोख्या रात्री आपला पट्टा विजेसारखा चमकावीत वाघावर हल्ला करून गरीब हऱ्याचे प्राण वाचविले होते. स्वारी-शिकारीच्या सर्व नोकरांस अन्नपाणी मिळाल्याशिवाय रामराव तोंडात पाण्याचा थेंब टाकीत नसत. बाह्यात्कारी उग्र पण अंतर्यामी कोवळे असे त्यांचे मन हऱ्याचा 'हुसेन' होतांच खळबळून गेले होते. 'धर्म सोडणाऱ्या या का—"

प्रथम गर्दन तोडतो ' असे म्हणून ते त्याजवर धावून गेले; परंतु बळजबरीने झालेले धर्मांतर ऐकताच त्यांनी त्याला जातीत घेण्याची पराकाष्ठा केली. तरी त्या काळच्या समजुतीप्रमाणे हुसेनचा परत हन्या होणे अशक्य झाले व रामरावाच्या कृपाछत्राखालून निघून हुसेनला जाफरखानाची नोकरी धरावी लागली.

* * *

त्या उमद्या प्राणदात्याचा लखोबा विश्वासघात करणार ! छेः ! छेः ! या हुसेन्याच्या जीवात जीव आहे तोपर्यंत रामरावाच्या केसासही कोणी धक्का लावू शकणार नाही, असे त्याच्या मनात विचार चालले होते.

शुक् ! शुक ! आता अगदी मुकाट्याने जावयाचे. लखोबाने भुयाराचे दार उघडून पाच शिपायांसह जाफरखानाच्या एका नाइकास रवाना करावयाचे आणि गावच्या दोन बाजूंनी इतर शिपायांनी वेढा देऊन नाकेबंदी करावयाची असा बेत सर्व शिपायांच्या कानांत परंपरेने पुटपुटला गेला.

हुसेनाने आपला घोडा दहापाच काठ्या अंतरावर पुढे नेला आणि शिंगाचे दोन फुंकारे देईपर्यंत आपल्याला कोणी अडथळा करू शकणार नाही अशी खात्री होताक्षणी त्याने शिंग तोंडास लावून आपली सर्व फुंकर एकत्र करून मोठा साद दिला. भोवतालच्या दऱ्यांतून त्याचे तीन पडसाद उमटून सर्व हेळवाक गाव खडबडून जागे झाले. वेसकराने इषाऱ्याची नौबत झाडिली आणि जागल्यांनी ' हुश्शार हुश्शार ' अशा आरोळ्या ठोकल्या.

" अरे निमकहराम, आमचे सगळे बेत तू आपल्या पोरकटपणाने धुळीला मिळविलेस ! " जाफरखानाने हुसेनची गचांडी धरून त्यास रागाने म्हटले.

" निमकहराम, कृतघ्न, विश्वासघातकी—" लखोबा त्यास शिव्या देऊ लागला.

" निमकहराम मी का सख्ख्या भावाला दगा करून मारू पाहणारा तू ? " हुसेनने आवेशाने विचारले.

" अरे, हा तर हऱ्या ! हे घे बक्षीस तुझ्या हरामखोरीचं ! " असे म्हणून तलवारीच्या फटक्यासरशी लखोबाने त्या पोरास घायाळ करून घोड्यावरून पाडिले. तोच हेळवाककडून या फौजेवर दोन-चार तीर आणि गोफणीचे दगड येऊन पडू लागले. तेव्हा सर्व फौजेने वाट सापडेल तिकडे पोबारा केला.

उजाडल्यावर विव्हळत पडलेल्या हुसेनास रामरावांनी पाहून त्यास औषधोपचार करविले. त्याने दिलेल्या इशाऱ्यामुळे हेळवाकवरचा हल्ला कसा परतला ते ऐकून सर्व गाववाल्यांची अंतःकरणे उचंबळून आली. हुसेन मेला त्या ठिकाणी त्यांनी समाधी बांधून त्याचे स्मारक केले. बालमित्रांनो, हुसेन ऊर्फ हऱ्याची ही आत्माहुती तुम्ही विसरू नका.



म्यानाच्याच दोन तडाक्यांनी राजपुत्राने वाघास पळवून लाविले

# ९ : राजपुत्राचा थरकाप

बेडरपूरचा राजपुत्र अभयसिंग याची अशी प्रतिज्ञा होती की, जी माझ्या अंगाचा थरकाप उडवील त्या मुलीशी मी लग्न करीन. त्याचा थरकाप उडविण्याकरिता पुष्कळ जणींनी प्रयत्न केले; पण एकीचा देखील यत्न सिद्धीस गेला नाही. चंपावती नावाच्या राजकन्येने त्याला भिव-विण्याकरिता श्रमपूर्वक एक योजना केली आणि त्याला शिकारीकरिता आमंत्रण दिले.

शिकारीच्या वेळी अभयसिंगाच्या अंगावर वाघ चालून आला; तेव्हा अभयसिंग म्यानातून तरवार उपसावयास पाहातो तो तिची मूठ म्यानास दोरीने घट्ट बांधून ठेविलेली आढळली. तरी पण तो भीतीने कापला नाही. म्यानाच्याच दोन तडाक्यांनी त्याने वाघास पळवून लाविले. लपून बसलेली चंपावती निराश झाली. मग तिने आणि तिच्या मैत्रिणींनी त्याला रानात एकटे सोडिले. भटकत असता त्याला एक दिवा दिसला. तेथे वसती असेल अशा आशेने तो त्या दिव्याच्या अनुरोधाने निघाला. समोर एक वाडा होता. वाड्याच्या अलीकडे एक चौकी होती. चौकीवर एक लांब दाढीवाला अक्राळविक्राळ पहारेकरी बसला होता. त्यास अभय-सिंगाने विचारले, " आजोबा, ह्या वाड्यात आजची रात्र राहावयास मिळेल काय ? "

पहारेकऱ्याने आपला अगडबंब सोटा त्याच्यावर उगारला; पण तो बिलकूल दचकला नाही. उलट हसत म्हणाला, " बरेच कोपिष्ट दिसता तुम्ही आजोबा ! "

पहारेकरी म्हणाला, " मुला, तुला आपला जीव नकोसा झाला आहे वाटतं ? ह्या वाड्यात शिरलेला मनुष्य जिवंत कधीही बाहेर निघाला नाही. आल्या वाटेनं परत जा कसा ! " अभयसिंग म्हणाला, " आ



भुतांच्या चेष्टा पाहून अभयसिंगाला उलट हसूच येऊ लागले

जिवंतपणी नाही तर मेलेला तरी बाहेर निघेन ना? मी आत जाणारच." असे म्हणून म्हाताऱ्याच्या अडथळ्यास न जुमानता तो दरवाजा उघडून वाड्यात शिरला. शिरताच दाराआड बसलेले दोनतीन साप त्याच्या अंगावर चालून आले. एका सापाकडे नजर द्यावी तर दुसरा उलट बाजूने यावयाचा. पण अभयसिंगाने सापाचा मुळीच बाऊ केला नाही. पहिल्या सापाला लाथेने झिडकारून तो म्हणाला, "चल नीघ गांडुळा! कोणाला भीती दाखवतोस?" त्याचा धीटपणा पाहून आणि भिऊन साप पळून गेले. वाड्यांत गडद अंधार पडला होता, काही केल्या वाट दिसण्यासारखी नव्हती. मात्र त्या अंधारात गुरगुरण्याचा आवाज ऐकू येत होता. तिकडे लक्ष जाताच अभयसिंगास लुकलुकणारे डोळे दिसले. "छान! ह्या दोन दिवट्या माझ्याकरिता कोणी तरी ठेविलेल्या दिसतात! चल बच्चा, वाट दाखीव!" असे म्हणून त्याने त्या डोळ्यांच्या मालकाची मानगुटी धरिली आणि त्या डोळ्यांच्या उजेडात दोन-तीन दालने ओलांडली.

नंतर एक मोठा दिवाणखाना त्यास लागला. त्यात चांगला प्रकाश होता. दिवे लागलेले होते. तेथे येताच त्याने ते दिवटे मांजर भिरकावून दिले आणि एका पलंगावर हाशहुश करीत बसला.

थोड्याच वेळात तेथे दोन अक्राळविक्राळ भुते आली आणि त्याच्या-पुढे नाचून वेडेवाकडे हातवारे करू लागली. परंतु राजपुत्र मुळीच डग-मगला नाही. उलट भुतांच्या चेष्टा पाहून खो खो हसू लागला.

एक भूत चिडून म्हणाले, "तुला सगळी चेष्टा वाटते आहे नाही का? दम धर. संध्याकाळच्या भाजीला तुझा आम्ही उपयोग करू."

ह्या धमकावणीला अभयसिंगाने दाद दिली नाही. उलट तो हसून म्हणाला, "माझी भाजी करायची तर आधी मला पाणी प्यायला आणून द्या. केव्हाचा मी तहानेला आहे. पाणी दिलं नाही तर भाजी अगदी कोरडी होईल."

भुतांनी त्याला पाणी आणून देताना सांगितले, "हे पाणी पी. आमच्या हातचं पाणी पिणारा मनुष्य पुन्हा सूर्य उगवलेला पाहात नाही."

अभयसिंग उत्तरला, "मी तरी अजून कधी पाहिला आहे सूर्य उगवताना? आम्ही उठणारच मुळी प्रहर दिवसा! जसा आजपर्यंत पाहिला नाही तसा पुढेही पाहणार नाही. त्यात काय मोठंसं?"

भुतांनी आणून दिलेले पाणी तो निर्भयपणे प्याला आणि पलंगावर पडून म्हणाला, "भुतांनो, मला आता झोप येत आहे. तुम्ही आपले चाळे बंद ठेवा आणखी माझ्या सोबतीला इथेच असा."

इतर लोक भुतांना पाहून पळ काढतात, उलट अभयसिंग त्यांना सोब-तीस बोलावतो हे आश्चर्यकारक खरेच. रात्रीच्या वेळी दहावीस भुते अक्राळविक्राळ किंकाळ्या फोडून भयंकर चाळे करीत होती. अभयसिंगाने डोळे उघडून त्यांजकडे पाहिले व म्हटले, "मूर्खांनो, तुम्हांला धिंगाणा घालायला दुसरी जागा नाही काय? विनाकारण माझी झोपमोड का करता? चालती व्हा, नाही तर एकेकाच्या पाठीत सोटा घालीन."

भुते मनात थिजून चालती झाली आणि अभयसिंग पुनः घोरू लागला. काही वेळाने उशाशी गुरगुरण्याचा आवाज ऐकू येऊन तो पुनः जागा झाला.

पाहतो तो आपल्या पायथ्याशी एक वाघ, उशाशी एक सिंह आणि दोन बाजूंस दोन अस्वले गुरगुरताना त्यास दिसली. ह्या हिंस्र पशूंना पाहून त्याच्या अंगाचा थरकाप झाला नाही. तो वाघास लाथ मारून म्हणाला, "ए बोक्या, इकडे कोठे उंदीर असले तर ते मारीत बैस!" तसेच एका अस्वलाच्या झिंज्या जोराने ओढून म्हणाला, "ए अस्वला, झिंज्या किती वाढल्या आहेत? एकदा हजामत करवून मग इकडे ये." त्याची छाती पाहून चारी प्राणी निराश झाले आणि त्यास पुनः झोप लागली. थोड्या वेळाने त्या दिवाणखान्यात चंपावती आणि तिच्या मैत्रिणी

यांनी प्रवेश केला. चंपावती म्हणाली, " आपण यांना भीती दाखविण्या-करिता जी जी सोंगं केली ती ती फुकट गेली. आता त्याच्या अंगाचा थरकाप होणार तरी कसा? आणखी मी ह्याची प्रतिज्ञा तरी कशी जिंकणार ? "

मैत्रिणीने उत्तर दिले, " ताईसाहेब, आपण घाबरू नका. मी तुमच्या-कडून ह्यांच्या अंगाचा थरकाप करविते." असे म्हणून तिने माठातील थंडगार झालेले दोन घागरी पाणी आणविले आणि ते राजपुत्राच्या अंगावर ओतण्यास तिला सांगितले. थंड पाणी अंगावर पडताच राजपुत्र एकदम जागा झाला. अंगात हुडहुडी भरून तो थरथर कापू लागला. मैत्रिणीने विचारिले, " महाराज, आता तरी आपल्या अंगाचा थरकाप झाला की नाही ? "

" झ–झ–झ–झाला ख–ख–खरा,"— तो अडखळत आणि कापत म्हणाला.

" ह्या आमच्या चंपावती ताईसाहेबांनी आपल्या अंगाचा थरकाप उडविला आहे. त्यांच्याशी आपल्या प्रतिज्ञेप्रमाणे आपल्याला लग्न केले पाहिजे."— मैत्रिणीने बजाविले.

अभयसिंग आणि चंपावती यांचे लवकरच लग्न लागले. मैत्रिणीला तिच्या चातुर्याबद्दल चांगला नवरा आणि एक इनाम गाव बक्षीस मिळाले.

आमची गोष्ट लांबच लांब, वाचणाराच्या घराला सोन्याचे खांब.

म. ... ग्रंथालय ...
... ७६६६ ...
विषय ... क्र. ३७ ...



गंगा गुरविणीस साक्षात श्रीशंकराचे दर्शन

धोंड्या आणि दगड्या हे दोघे मुलगे फार खट्याळ पण हाडाचे दयाळू होते. त्यांच्या खोड्यांपासून गावातील लोकांस विशेष उपद्रव न होता त्यांचे थोडेबहुत कल्याणच होत असे. एकदा ते नदीवर खेकडे पकडण्यास गेले असता तेथे कपडे धूत असलेल्या राधा नावाच्या तरुण बाईचा साबण त्यांनी लपविला. साबण नाहीसा झालेला पाहून राधा ओक्साबोक्शी रडू लागली. साबण हरविल्याबद्दल शिक्षा म्हणून सासू आपल्याला उपाशी ठेवील, डाग देईल आणि नाही नाही ते बोलेल असे ती विलपू लागली.

तिच्या विलापाने खजील होऊन धोंड्याने साबण परत देत विचारले, "खरेच का राधे, तुझी सासू तुला छळते? तर मग मी तिचा चांगला बंदोबस्त करतो."

"नको रे बाबा. करायला जाशील एक आणि होईल भलतंच. तिला अधिकच राग येऊन ती माझा जास्त छळ करायला लागेल", राधा घाबरून म्हणाली.

दुसऱ्या दिवशी पहाटे राधेची सासू गंगा हिने सुनेच्या पाठीत लाथ मारून शिव्या देत तिला उठविले. नंतर सुनेकडून पाणी तापवून स्नान करून ती शंकराच्या दर्शनास निघाली. अजून दिवस उगवला नसल्याने अर्धवट अंधारच होता. देवळाजवळ पोहोचण्याच्या वेळी शंखाचा आवाज जवळजवळ येत आहे असे तिला भासले. परंतु तो भास नसून सत्य आहे असे लक्षात येण्यास तिला फारसा वेळ लागला नाही; कारण श्री शंकराची स्वारीच पांढऱ्या शुभ्र नंदीवरून समोरून येत होती. दोन बाजूंस दोन गण होते; पैकी एक शंख वाजवीत होता व दुसऱ्याजवळ डमरू होते. प्रत्यक्ष महादेवाने दर्शन देताच गंगेचे मन किती थरारले असेल त्याची कल्पना होणे शक्य नाही. ती पाया पडून बोलण्याचा यत्न करू

परंतु शब्द उमटेना. शंकरांनी डोक्याकडे हात नेला, तृतीय नेत्र उघडला व रागाने म्हटले, " तूच गंगा गुरवीण, नाही का ?"

गंगेची बोबडी वळली.

" तू आपल्या पतिव्रता सुनेचा छळ करतेस, रात्री निजलेली उठवून स्वतःचे काम करायला लावतेस; क्षुल्लक चुकीबद्दल तिला कठीण शिक्षा करतेस, माहेरी धाडीत नाहीस; ह्या सगळ्या अपराधांबद्दल तुला कडक शासन दिले असते पण एकदा गय करतो. तिला पोटच्या मुलीप्रमाणे वागवले नाहीस तर ह्या तृतीय नेत्राने तुला जाळून भस्म करीन." असे म्हणून शंकराने पुन्हा डोक्याकडे हात नेला आणि तृतीय नेत्र मिटला.

गंगा घाबरून डोळे मिटून जमिनीवर पडली. शंकराची स्वारी थोडी पुढे गेली. एक गण दुसऱ्यास म्हणाला, " कसं काय धोंड्या, आपण म्हातारीला चांगलंच फसवलं. ती आता राधेच्या वाटेस जाणं शक्य नाही. होय की नाही महादेवा ? "

शंकराने जटांतून विजेची दिवटी उपटून काढिली व विकट हास्य करीत म्हटले, " हा माझा तृतीय नेत्र डोक्यात फार खुपत होता रे ! तशीच ही दाढी गळून पडते की काय असं भय वाटत होतं ! "

नंदीवरून उतरून व त्याच्या पाठीवर थाप मारून शंकराने म्हटले, " बाकी आपल्याला धर्मा धोब्याने हा बैल दिला नसता तर सोंगाची बतावणी करायला अवघड गेलं असतं."

नंदीला कुरवाळीत शंकराने त्याच्या तोंडाशी आपले तोंड नेताच बैलाने त्या त्रैलोक्यनाथाची दाढी मटकावून टाकिली आणि शंकराच्या जागी धोंड्या उभा राहिलेला दिसला.

देवदर्शनाहून परत येताच सुनेच्या पाठीवरून मायेने हात फिरवीत गंगा म्हणाली, " माझी बाय गो ! आज तू लई थकलेली दिसतीस. पथारी पसरून विसावा घे वाईच. मी स्वयंपाकपाणी करित्ये."

# ११ : शाळा-शाळा

( संवाद )

दत्तू—आज पाऊस फार पडत आहे बुवा ! बाहेर पडण्याची सोय नाही; आपण इथेच घरातल्या घरात खेळण्याजोगा एखादा खेळ खेळू या.

रामू—आपण शाळा-शाळा खेळू या. मी मास्तर होईन—

रमण—तू नको आम्हांला मास्तर ! तुला खेळातली मास्तरकी मिळाली तरी खरे मास्तरच तुझ्या अंगात संचारतात. त्यापेक्षा मी आपला गरीब मास्तर होईन. कोणाला मार तर देणार नाहीच, पण मार्क मात्र भरपूर देईन.

अब्दूल—अरे पोरांनो, असा तंटा करू नका. आपण चिठ्ठ्या टाकू. नाव येईल, त्यानं मास्तर व्हावं. ज्याच्या चिठ्ठीवर पहिल्यांदा माशी बसेल तो मास्तर होईल.

( चिठ्ठ्या टाकतात. दत्तू आपल्या चिठ्ठीस थुंकी लावतो. अर्थात त्याच्या चिठ्ठीवर माशी बसते. "माझं नाव आलं. उचला ही चिठ्ठी. दत्तोबा मास्तर झाले ", असा गोंगाट. मध्यभागी एका घडवंचीवर दत्तू बसतो. मुले दोन्ही बाजूंस बसतात. )

दत्तू—हं ऽ ऽ ऐका रे, ( खोक्याच्या टेबलावर छडी आपटून ) आजचा धडा सुरू करण्याच्या अगोदर समर्थांचा एक श्लोक आपण म्हणू या. तुम्ही माझ्या मागून एकेक चरण म्हणा.

मना दुर्जना भक्तिपंथें न जावें ।<br>
तरी देव तो पाविजे ना स्वभावें ॥<br>
जनीं निंद्य तें सर्व भावें करावें ।<br>
जनीं वंद्य तें सर्व टाकोनि द्यावें ॥

आता आपापल्या पाट्या काढा. कचऱ्याच्या नव्हेत बरं का ?

रामू—दत्तू! (दत्तू जोराने छडी आपटतो त्याबरोबर दचकून) आपलं सर, मला एक शंका आहे.

दत्तू—विचार खुशाल. मुलांनी शंका विचारल्या की, मला आनंद वाटतो. विचारणारांचीच उणीव आहे. " उणीव रसिकांचीच खरी "! त्याप्रमाणे माझ्या वर्गात शंकेखोरांची उणीव आहे. बरं, विचार आता आपली शंका.

रामू—सर, हा भावे कोण हो? जिथं तिथं सगळ्या कवितांत लुडबूड करीत असतो. ' जनीं वंद्य तें सर्व भावें करावें ', असं एका श्लोकात आहे. दुसऱ्या एका श्लोकात असं आहे, ' भावें भजावें ईश्वरा, मग संकटा कुठला थारा? ' भाव्यालाच काय म्हणून ईश्वराला भज, वंद्य गोष्टी कर असं कवी सांगतो? शिवाय दररोज आरतीच्या शेवटी, ' प्रेमें आलिंगन, आनंदें वंदीन, भावें ओवाळीन रूप तुझें ', असं आम्ही म्हणत असतो.

अब्दूल—मानापमान नाटकातबी पद आहे. प्रेमभावे जीव जगीं या, एकचि रस प्याला ऽ ऽ ( नाचतो व हेल काढतो ).

दत्तू—( छडी आपटून ) चूप रे, इथे काय नाटकगृह आहे का पदं म्हणायला? रामूची शंका बरोबर आहे. जनी वंद्य ते कर, ईश्वराला भज वगैरे उपदेश ज्या अर्थी भावे नावाच्या मुलालाच उद्देशून केलेले असतात, त्या अर्थी हा कोणी फार पापी मनुष्य असला पाहिजे. पण त्याच्याविषयी मला फारशी माहिती नाही. हेडमास्तरांना विचारून उद्या सांगेन. हसता काय गाढवांनो! मास्तर म्हणजे काही सर्वज्ञ नाही, जशा तुम्ही आपल्या शंका मला विचारता तशा मी आपल्या शंका हेडमास्तरांना विचारतो. यात हसण्यासारखं काय आहे?

रमण—मग हेडमास्तर त्यांच्या शंका कुणाला पुसतात? दिपोटीला होय!

दत्तू—आता ही मालिका पुरे झाली. नाहीतर परमेश्वरापर्यंत सग-

ज्यांची नावं सांगावी लागतील! दुसरी उपदेशपर कविता मी म्हणतो, मागून तुम्ही एकेक चरण म्हणा ( मुले त्याच्या मागून म्हणतात. ).

खोटे सदा बोलत जावे। नित्य चोरीसी करावे ॥
शिव्या सर्वां देत असावे। सर्वांसंगे भांडत जावे ॥
पाहिले ते मागुनि घ्यावे। गोड धोड फार खावे ॥

पण लक्षात ठेवा, बाबांनो, याप्रमाणे जो वर्तन करील त्याचा काय परिणाम होईल तो आता सांगतो :—

चित्ती धरी जो हे बोल। त्याचे वाटोळे होईल ॥

आता विठू, घंटेचे टोले दे. ठण्ठण्. सृष्टिज्ञानाचा तास सुरू झाला. तुम्हांला ठाऊकच आहे की, पृथ्वी वाटोळी आहे.

रामू—कशावरून सर?

दत्तू—अरे वेड्या, ज्या अर्थी पृथ्वी वर्तुलाकार आहे त्या अर्थी ती वाटोळी असणारच. मी जर म्हटलं असतं ती चौकोनी आहे, तरी तुम्ही विचारलंच असतं चौकोनी कशावरून? तर काहीतरी एक धरून चाललंच पाहिजे. म्हणून मी म्हणतो, ती वाटोळी आहे. आपलं जेवायचं ताट नसतं का वाटोळं? मग पृथ्वी वाटोळी असायला काय हरकत आहे? बरं, पृथ्वी-भोवती काय आहे? सांगा लवकर.

रमण—आकाश आहे सर.

अब्दूल—नाही सर, ढग आहेत.

रामू—वाताचं वरण आहे, मास्तर.

दत्तू—अरे हे पाहा, एखाद्यानं तुमच्यापुढे पेढा केला तर तुम्ही काय म्हणाल?

सगळे—हा आम्हांला पाहिजे आहे.

दत्तू—( गोंधळून ) तसं नव्हं रे, हा तुम्हांला हवा आहे का नको, असं विचारलं तर तुम्ही काय म्हणाल?

सगळे—हवा आहे.

दत्तू—किती शहाणी मुलं आहेत! पृथ्वीच्याभोवती काय आहे या प्रश्नाचं उत्तर ' हवा आहे ', असं सगळ्यांनी बरोबर दिलंत. पृथ्वीच्या भोवती चंद्र, सूर्य आणि तारे हे सारखे फेऱ्या घालीत असतात. सूर्य हा काय आहे ?

रामू—देव आहे सर. आम्ही त्याला रोज बारा साष्टांग नमस्कार घालतो.

अब्दूल—तो एक तापलेला लोहगोळा आहे, सर.

दत्तू—तो एक वाटोळा गृह आहे गृह !

रमण—गृह नाही, ग्रह.

दत्तू—ऐक, मी सांगेन तेच खरं. तो एक ग्रह आहे आणखी तो दररोज सकाळी पूर्वेला जोगेश्वरीच्या टेकडीवर उगम पावून संध्याकाळी समुद्रात अस्ताला जातो.

अब्दूल—मग तो समुद्रात बुडून विझत कसा नाही सर ?

रामू—मग दररोज नवीन सूर्य उदयाला येतो की काय ?

दत्तू—अरे दगडा, दररोज कोठून येणार ? तोच संध्याकाळी पश्चिमेकडून उलट पूर्वेला परत जातो.

रामू—मग तो आपल्याला दिसत कसा नाही सर ?

दत्तू—अगदीच बेअकली आहेस तू ! अरे रात्रीच्या अंधारात तो परत जाताना दिसणार कसा ? असो; सूर्य पृथ्वीपेक्षा दसपट मोठा आहे.

रामू—तर मग ढगांतला पाऊस पृथ्वीपर्यंत पोचतो कसा ? सूर्यावर आदळून मध्येच थांबत कसा नाही ?

दत्तू—ठण्ठण्. सृष्टिज्ञानाचा तास आता संपला. आता तोंडचे हिशेब घेऊ या.

रामू—सर, हिशेबाऐवजी तोड्यांची उदाहरणं घाला. ती मला फार

आवडतात. दोन तोट्यांनी हौदात पाणी घ्यायचं, आणखी एका तोटीनं बाहेर सोडून द्यायचं हा खेळ मला गंमतीदार वाटतो. घरी मी खूप वेळ अशी मजा करतो.

अबदूल—अरे जा लेका—

दत्तू—अबद्या मूर्खा, गाढवा, पाजी माणसा! शिव्या देऊन तोंड खराब करून घ्यायला, लाज नाही वाटत तुला? निर्लज्ज कुठचा! मला अत्यंत चीड येते दोघांची—काही पाजी-हलकटांना शिव्या देण्याची खोड असते त्यांची, आणखी कांही फूलस्‌ना मराठी बोलताना इंग्लिश वर्ड्स यूज करण्याची हॅबिट लागून राहिलेली असते त्यांची अशा.

रमण—(हळूच) दत्तोबा, कुलकर्णी मास्तर आड उभे राहून पाहात आहेत वाटतं!

दत्तू—(गडबडून) कायरे अबदूल, चक्रवाढ व्याजाची रीत समजली का तुला?

मास्तर—(एकदम आत शिरून) कायरे हा कसला खेळ चालला आहे तुमचा? खरोखरच्या शाळेचा कंटाळा करायचा आणि खेळात मात्र शाळा आवडते नाही का? आणखी आमच्या नकला करिता? (दत्तूची शेंडी पकडतो. तो आई, आई, मेलो मेलो, असे ओरडतो.) उनाड सान्या मुल-खाचे! (बाकीची मुले पळून जातात. मास्तर प्रेक्षकांकडे पहात बोलत राहतात.) ह्या गांधींच्या चळवळीपासून मुलं अगदी बेफाम झाली आहेत. गुरुजनांबद्दल काडीचा आदर राहिला नाही त्यांच्यात (रामू कातरी घेऊन येतो व दत्तूची शेंडी कातरतो. दोघे पळून जातात.). अहो! त्या दत्त्यानं माझी डायरी पळवून नेली आणखी तिच्यातला मजकूर गावभर सांगत सुटला. बरा सापडला आहे आता! देऊ का एक थोतरीत? (हाता-तील शेंडीच्या दुसऱ्या टोकाशी दत्तू नाही असे पाहून चवताळतो व हात-वारे करीत जातो.)



मालकाच्या निर्बंधास न जुमानता तो पायगाडीसह नाहीसा झाला

## १२ : भोळसटपणाचा परिणाम

भोलानाथाला त्याच्या वडिलांनी नवीन पायगाडी आणून दिली. भाड्याची पायगाडी घेऊन तो पायगाडीविद्या चांगलीच शिकला होता. परंतु घंटा नाही, दिवा नाही, चाकांवरील चिखलपट्ट्या खडखड आवाज करीत आहेत, खोगिराचे चिमटे बसत आहेत, दाब लागतच नाही, असा तो भाड्याच्या पायगाडीचा अवतार कोणीकडे आणि टांग मारून स्वार होताच सापाप्रमाणे रस्त्यावरून सरसर धावत जाणारी कोरी पायगाडी कोणीकडे ! श्यामभटाची तट्टाणी आणि इंद्राचा ऐरावत यांतलीच तफावत ह्या दोहोंत दिसून येत होती.

भोलानाथ आपले नवे वाहन घेऊन पहिल्या दिवशी गावभर भटकला. दुसऱ्या दिवशी त्याच्या मनात आले की, पहाटे उठून घरापासून पाच कोस अंतरावरील आपल्या शेतीच्या गावी जावे, तेथून मक्याची कणसे किंवा एखादी भाजी खुणेकरिता घ्यावी आणि जेवणाच्या वेळेपर्यंत घरी परत येऊन आईबापांस आणि भावंडांस चकित करावे.

आपल्या बेताप्रमाणे तो पहाटे उठला आणि धावांत हवा भरून सूर्योदयापर्यंत शेतीच्या गावी जाऊन पोहोचला. तेथे शेतावरील कामकऱ्यांस आपल्या आरोहणचातुर्याने त्याने थक्क केले. मग इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर भोलानाथाने कामकऱ्यांजवळून काही भाज्या आणि कणसे मागून घेतली, ती बरोबरच्या पिशवीत कोंबली आणि पिशवी पायगाडीच्या शिंगावर लटकावून तो घरी परत येण्यास निघाला. दोन कोस आल्यावर मागील चाक उजव्या दाबावर घासू लागून वाहनाची गती मंद झाली. भोलानाथ उतरला आणि हत्यारदानातून पान्हा काढून चाक सरळ करण्याचा त्याने यत्न केला; पण उलट ते इतके घट्ट झाले की फिरेनाच. तेव्हा तो मोठ्या काळजीत पडला.

थोड्या वेळाने एक बूटपाटलोणवाला मनुष्य पायगाडीवरूनच येत होता. त्याने भोलानाथाची अवस्था पाहिली. समव्यवसायी संकटात पडलेला पाहून कोणाला सहानुभूती वाटणार नाही ? " काय हो साहेब, भोकबीक पडलं की काय ? " उतरत उतरत तो म्हणाला.

" भोक नाही पडलं पण मागलं चाक सैल झालं आहे असं वाटतं." भोलानाथ आशेने त्यास म्हणाला.

" हत्यारदान आहेच नाही का तुमच्याजवळ ? कोनपान्हा द्या जरा की आता नीट करू त्याला ", असे आश्वासन देऊन त्या नव्या गृहस्थाने पान्हा इकडेतिकडे फिरवून मागील चाक सैल केले. नंतर, " यत्न करून बघतो दोन मिनिटं ", असे म्हणून त्याने भोलानाथाच्या पायगाडीवर टांग मारिली व मालकाच्या 'अहो अहो' अशा निषेधास न जुमानता तो क्षणार्धात पायगाडीसह नाहीसा झाला.

दोन मिनिटांऐवजी दोन तास वाट पाहिल्यावर भोलानाथाच्या लक्षात आपला भोळेपणा आणि त्या मनुष्याची लबाडी आली. त्याची पायगाडी भाड्याचीच दिसत होती आणि तिचे भाडे तासाला एक आणा नसून महिन्याला एक आणा असावे असे तिच्या स्वरूपावरून दिसत होते. तिच्यावर आरोहण करून ती कशीबशी रेटीत दुपारी बारा वाजता भोलानाथाची स्वारी आपली नवीन पायगाडी गमावून आणि तिजबद्दल ही पुराणवस्तुसंग्रहात शोभण्यासारखी चीज बरोबर घेऊन घरी आली.

अद्यापिही भोलेनाथास ह्या जुन्या पायगाडीवरूनच हिंडावे लागते. म्हणून मुलांनो, त्याच्यासारखी आपली अवस्था होऊ नये अशी तुमची इच्छा असेल तर वाटेल त्या अलबत्यागलबत्यावर भरंवसा टाकू नका.

१३ : रोज वाढदिवस

बाबीचा आठवा वाढदिवस होता. तिचे आईबाप फार हौशी असल्याने त्यांनी मोठ्या थाटाने तो साजरा केला. सकाळी तिला आईने सुगंधी तेल आणि साबण लावून न्हाऊ घातले. तिच्याकडून घुसळखांबाची पूजा करविली. नंतर आई, बाबा, दादा आणि बाळ ह्यांच्याबरोबर ती मोटारीत बसून देवीच्या पाया पडून घरी परत आली.

परत आल्यावर बाबांनी फूटपट्टीने तिची उंची मोजली व म्हटले, " बाबी ! गेल्या वाढदिवसापेक्षा तुझी इंची दोन उंचांनी वाढली आहे."

बाबांच्या बोलण्यातील चुकीमुळे सर्वजण हसले. बाबा म्हणाले, " तुम्हांला हासवायला मी मुद्दामच चुकलो. आता तुझे वजन करू या."

वजन केल्यावर ते चार रतलांनी मोठे झालेले दिसले. बाबांनी कौटुंबिक टाचणवहीत सर्व नोंद केली.

दुपारी बाबीच्या मित्रमंडळीला फराळाला बोलाविले होते. कित्येकांनी खेळणी, पुस्तके, उपयोगी वस्तू इत्यादी भेटी तिला दिल्या. फराळाला कित्ती कित्ती पदार्थ केले होते म्हणून सांगू ? पण तुमच्या तोंडाला पाणी सुटेल आणि ते सांडून हे पान खराब होईल म्हणून त्यांची नावे देत नाही.

फराळ झाल्यावर मुले नाना प्रकारचे खेळ खेळली. खेळून दमल्यावर गोष्टी-गाणी झाली. अगदी संध्याकाळी मुले बाबीचे अभिनंदन करून घरोघर परत गेली. बाबीला वाढदिवसाचा फारच आनंद झाला आणि रोजच आपला वाढदिवस असावा असे तिच्या मनात घोळू लागले.

विचार करता करता तिचा डोळा लागला आणि जराशाने तिच्या कानी शब्द पडले, " बाबी, ऊठ आज तुझा दहावा वाढदिवस आहे." ती आनंदाने उठली. तिची उंची सहा इंचांनी वाढली होती. दादापेक्षा आता ती बोट-भरच ठेंगणी होती. मित्रमंडळीबरोबर बागडत असता दमल्याने ती एका

झाडाच्या सावलीत निजली.

" बाबीताई, उठा. आता तुमचा पंचविसावा वाढदिवस आहे," असे आईचे शब्द ऐकून ती खडबडून उठली. दादा तिच्यापेक्षा फारच लहान राहिला. आई तर तिला थोरल्या बहिणीप्रमाणे वाटू लागली. मैत्रिणी तिला अहोजाहो म्हणू लागल्या; कारण त्या जेवढ्याच्या तेवढ्याच राहिल्या होत्या. तिने आपल्या खुर्चीवर बसण्याचा यत्न केला पण ती नाजूक खुर्ची काडकन मोडली. आई, मला पेपरमीठ दे असा तिने हट्ट केला तेव्हा आई म्हणाली, " बाबीताई, तुम्ही आता मोठ्या बाई झाला आहा. असा हट्ट करणे बाळला शोभेल, तुम्हांला नाही." हे ऐकून बाबीला फार वाईट वाटले. रोज वाढदिवस होत जाऊन आपले बाळपण लौकर संपलेले तिला आवडले नाही.

दोन्ही हातांनी तोंड झाकून ती ओक्साबोक्शी रडू लागली. रडता रडता तिला झोप लागली आणि पुनः जागी होऊन आरशात पाहाते तो आपले तोंड सुरकुतले आहे, केस पिकले आहेत आणि पाठ वाकली आहे असा देखावा तिला दिसला. दादा तिजकडे आला व म्हणाला, " ए म्हातारे ! तुझे इथे काय काम आहे ? " बाबा आणि आई तिच्याहून किती तरी लहान दिसत होती ! आईने रागावून दादास दाटले, " दादा, का तिची बिचारीची थट्टा करतोस ? रोज वाढदिवस व्हावा अशी इच्छा केल्यामुळे बिचारी बेचाळीस दिवसांत पन्नास वर्षांची म्हातारी झाली आहे."

आईचे शब्द ऐकताच म्हाताऱ्या झालेल्या बाबीस रडू कोसळले. नको ग आई, तो रोजचा वाढदिवस. वर्षातून एकच वाढदिवस पुरे आहे, असे ती कळवळून म्हणाली.

मग जास्त कोण करीत बसले आहे ? झोपेत बडबडते आहे बाबी बिचारी ! असे तिच्या अंगावरून हात फिरवीत आई म्हणाली. बाबीने

डोळे उघडून पाहिले आणि विचारले, " आई, मी म्हातारी नाही ना झाल्ये ? "

" वेडी कुठली ! आठव्या वर्षी का कुणी म्हातारे होत असते ? बहुतकरून तुला स्वप्न पडत असेल. फराळाचे जरा जास्त खाल्ले की अजीर्ण होऊन स्वप्न पडते ", आई म्हणाली.

मग नको ना तुम्हांला रोज वाढदिवस ?

दैनिक वर्तमानपत्रात येणाऱ्या बातम्या घाईने छापावयाच्या असतात, म्हणून छापखान्यातील मुकादम लिहिलेल्या कागदाचे तुकडे करून वेगळाल्या खिळे-जुळाऱ्यांकडे जुळविण्यास देतात. कधी कधी जुळविलेला मजकूर ओळीने जमविण्यात चूक होऊन तुकडे १, २, ३, ४ अशा क्रमाने न जमता १, ३, २, ४ अशा क्रमाने येतात. वेडगावसमाचार पत्राच्या दोन बातमीदारांनी खालील दोन बातम्या वेगळाल्या पाठविल्या होत्या. पहिली एका स्वागत-समारंभाची आणि दुसरी आहिताग्नी धोंडशास्त्री दीक्षित यांनी केलेल्या यज्ञाची होती. या दोन बातम्यांतील वाक्यांची मिसळ होऊन पत्राच्या अंकांत तिसरीच चमत्कारिक बातमी प्रसिद्ध झाली.

[ १ ]

शिक्षणदिवाण निरक्षरसिंग यांची स्वारी आगगाडीतून ओट्यावर उतरताच तीस पुष्पहारांनी मंडित करण्यात आले. स्टेशनातून बाहेर पडताच पेडगाव जिल्हा बालचमूने त्यांस सलामी दिली आणि त्यांच्या गार्ड ऑफ ऑनरची पाहाणी करून ते बाहेर येतात तोच पोलिस पलटणीने सुस्वर वाद्यांनी वंदे मातरम् पद वाजविले. महिलामंडळाने श्रीमती सौ. हरकुंवरबा यांचे हस्ते हार चढवून कुंकमतिलक लाविल्यावर दिवाणसाहेबांस मुद्दाम उभारलेल्या मंडपाकडे नेण्यात आले. तेथे निरक्षरसिंगजींनी मतदारांस उद्देशून आभारप्रदर्शक भाषण करण्यास प्रारंभ केला. पण आनंदाने व प्रेमाने कंठ दाटून आल्याने त्यांचा जो थोडाबहुत आवाज ऐकू येत होता, तोही लोकांच्या जयजयकारात आणि मंगलवाद्यांच्या आवाजात बुडून गेला. निरक्षरसिंगजींस निवडणुकीत मिळालेल्या अपूर्व यशाबद्दल आम्ही त्यांचे हार्दिक अभिनंदन करून त्यांस दीर्घायुष्य चिंतितो.

[ २ ]

आहिताग्नी दीक्षितांनी एक कावळ्यासारखा काळा आणि दुसरा बगळ्यासारखा पांढरा असे दोन बोकड यज्ञमंडपात आणिल्यावर त्यांस पुष्पहारांनी मंडित करण्यात आले. नंतर दीक्षितपत्नीने त्यांस हार चढवून कुंकमतिलक लाविल्यावर वेदमंत्रांच्या घोषात त्यांचे पूजन करण्यात आले. नंतर ह्या बिचाऱ्यांचा कंठ बांधून त्यांचा वध करण्यासाठी त्यांजवर बुक्क्यांचा मारा करण्यास प्रारंभ झाला. कोण हा अमानुष प्रकार! ह्या मुक्या प्राण्यांनी बे बे केले असते; पण त्यांचा कंठ बांधल्याने त्यांचा जो थोडाबहुत आवाज ऐकू यावयाचा तोही लोकांच्या जयजयकारात आणि मंगलवाद्यांच्या आवाजात बुडून गेला आणि ते बिचारे घटकाभर तडफड करून गतप्राण झाले. दीक्षितांनी धर्माच्या नावाखाली चालविलेल्या ह्या क्रूर अमानुषतेबद्दल आम्ही त्यांचा तीव्र निषेध करितो.

[ ३ ]

शिक्षणदिवाण निरक्षरसिंग यांची स्वारी आगगाडीतून उतरताच तीस पुष्पहारांनी मंडित करण्यात आले. स्टेशनातून बाहेर पडताच गार्ड ऑफ ऑनरची पाहणी करून ते बाहेर येतात तोंच पोलिस पलटणीने सुस्वर-वाद्यांनी वंदे मातरम् पद वाजविले. महिलामंडळाने श्रीमती सौ. हरकुंवरबा त्यांच्या हस्ते हार चढवून कुंकमतिलक लाविल्यावर वेदमंत्रांच्या घोषात त्यांचे पूजन करण्यात आले. नंतर त्या बिचाऱ्यांचा कंठ बांधून त्यांचा वध करण्यासाठी त्यांजवर बुक्क्यांचा मारा करण्यास प्रारंभ झाला. कोण हा अमानुष प्रकार! त्यांचा कंठ बांधल्याने त्यांचा जो थोडाबहुत आवाज ऐकू यावयाचा तोही लोकांच्या जयजयकारात आणि मंगलवाद्यांच्या आवाजात बुडून गेला आणि ते बिचारे घटकाभर तडफड करून गतप्राण झाले. दीक्षितांनी धर्माच्या नावाखाली चालविलेल्या ह्या क्रूर अमानुषतेबद्दल आम्ही त्यांचे हार्दिक अभिनंदन करून त्यांस दीर्घायुष्य चिंतितो.

BVBK-0401666

# कॉन्टिनेन्टल प्रकाशित

ओसाडवाडीचे देव ( विनोदी कथा ) : चिं. वि. जोशी
मोरू आणि मैना : चिं. वि. जोशी
चिमणचारा : चिं. वि. जोशी
गड आला पण सिंह गेला : ह. ना. आपटे
अमोल गोष्टी : साने गुरुजी
अमृत-तुषार ( सुभाषिते व भाष्य ) ग. वि. अकोलकर
आशियाचे धर्मदीप ( चरित्रे ) गोपीनाथ तळवलकर
आनंदभुवन ( पं. नेहरूंचे चरित्र ) गोपीनाथ तळवलकर
आत्मकथा : पं. नेहरू ( सं. अनुवाद ) ना. ग. गोरे
एव्हरेस्टच्या कुशीत मी ( आत्मवृत्त ) शेर्पा तेनसिंग
सागर दिग्विजय ( जलतरण कथा ) बॅ. मिहिर सेन
सुभाष ( चरित्र ) भा. कृ. केळकर
स्वराज्यावरील ( सात ) संक्षिप्त कादंबऱ्या : नाथमाधव
कँटरबरी कथा ( चॉसर ) अनुवाद रमेश मुधोळकर
गांधींची गोष्ट : आपटे गुरुजी
गुप्त खजिना ( ट्रेझर आयलंडचे संक्षिप्त भाषांतर ) ह. भा. वाघोलीकर
डेव्हिड कॉपरफील्ड ( सं. अनुवाद ), वि. कृ. श्रोत्रिय
दहा धाडसी कुमार ( कथा ) वि. कृ. श्रोत्रिय
दिवाणी दावा ( एकांकिका ) वि. वा. शिरवाडकर
दिवाकरांच्या नाट्यछटा
माझी जन्मठेप ( सं. ) वि. दा. सावरकर
सत्तावनचे स्वातंत्र्यसमर ( सं. ) वि. दा. सावरकर

# निवडक कुमार वाङ्मय

पळवलेला पोर ( किडनॅप्डचे सं. भाषांतर ) वि. कृ. श्रोत्रिय
पानिपतची मोहीम ( संक्षिप्त कादंबरी ) ना. वि. बापट
प्रवासी ( सं. ) ना. सी. फडके
महात्मा फुले ( चरित्र ) वसंत देसाई
मादाम मेरी क्यूरी ( चरित्र ) ग. वि. अकोलकर
रूमीच्या नीतिकथा : श्रीपाद जोशी
लोकमान्य टिळक ( चरित्र ) ना. सी. फडके
वसंत-पंचक ( विनोदी कथा ) वि. वि. बोकील
विद्यामंदिर ( विनोदी एकांकिका ) ना. धों. ताह्मनकर
वेदातील गोष्टी ( भाग १–२ ) वि. कृ. श्रोत्रिय
श्यामसुंदर ( सं. ) श्री. कृ. कोल्हटकर
शंख आणि शिंपले ( आठवणी ) ना. ग. गोरे
शांतिनिकेतन ( टागोरांचे चरित्र ) गोपीनाथ तळवलकर
श्रीरामायण कथा : त्र्यं. ग. बापट
श्रीमहाभारत कथा : त्र्यं. ग. बापट
सावटातलं रोप : ना. धों. ताह्मनकर
पुन्हा तिरसिंगराव ( विनोदी कथा ) आनंद घाटुगडे
टॉम जोन्स ( सं. कादंबरी ) अनुवाद द. धों. नगरकर
नदीकाठची चक्की ( सं. अनुवाद ) वामन पात्रीकर
बाभूळगावचा जहागिरदार एकांकिका : मनोहर शिरवाडकर
कथा भागवत ( भाग १–२ ) : शं. रा. देवळे